




दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, २ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३४ | किंमत : २ रूपये



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


थोडक्यात

## एलपीजी सिलिंडर २०० रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली :** व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत १ ऑगस्टपासून मोठी कपात करण्यात आली आहे. तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या दरात दिल्लीत २०२ रुपये, तर कोलकात्यात २०९ रुपयांची घट केली आहे. मात्र, घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
नव्या दरांनुसार, १ ऑगस्टपासून कोलकात्यात १९ किलोचा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर २,८७२.५० रुपये दराने उपलब्ध होणार आहे. तर दिल्लीतही सिलिंडरच्या दरात २०२ रुपयांची कपात करण्यात आली असून व्यावसायिक ग्राहकांना याचा थेट लाभ मिळणार आहे.
विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या महिन्यात व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत. यापूर्वी १ जुलैपासून दिल्लीतील १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या दरात १८३.५० रुपयांची कपात करण्यात आली होती. त्या बदलानंतर दिल्लीतील किरकोळ किंमत २,९३० रुपये झाली होती. दरम्यान, तेल विपणन कंपन्यांनी १ जुलैपासून ५ किलो फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही १३ रुपयांची कपात केली होती. या सुधारणेनंतर दिल्लीमध्ये ५ किलोचा एफटीएल सिलिंडर ८०८.५० रुपये दराने उपलब्ध आहे.
व्यावसायिक वापरासाठी असलेल्या निळ्या एलपीजी सिलिंडरचे दर तेल विपणन कंपन्यांकडून सातत्याने कमी केले जात असले, तरी घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर मात्र जैसे-थेच राहिले आहेत. म्हणजेच, घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही.

# भारताचा गोल्डन डे !

## एकाच दिवशी ८ सुवर्ण, बॉक्सरचा धमाका, ७ पदकांची कमाई

**वृत्तसंस्था, ग्लासगो**

भारतासाठी शनिवारचा दिवस गोल्डन डे ठरला. कारण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आज एकाच दिवशी भारतीय क्रीडापटूंनी तब्बल ८ सुवर्ण पदकांची कमाई केली. यामध्ये भारतीय बॉक्सरनी सुवर्ण धमाका करीत एकाच दिवशी ७ सुवर्ण पदके पटकावली. सर्वप्रथम जॅस्मिन लांबोरिया (महिला ५७ किलो बॉक्सिंग), प्रीती पवार (महिला ५४ किलो बॉक्सिंग) या दोघींनी सुवर्ण कमाई केली. त्यानंतर साक्षी चौधरी (महिला ५१ किलो बॉक्सिंग), प्रिया घंघास (६० किलो बॉक्सिंग), अरुंधती चौधरी (७० किलो बॉक्सिंग) आणि अंकुश पंघाल (७५ किलो) आणि सचिन सिवाच (६० किलो) अशा ७ बॉक्सरनी सुवर्ण पदक पटकावले तर पॅरा एफ ५७ शॉट पुटमध्ये सोमन राणाने सुवर्ण कमाई केली. याच स्पर्धेत शुभम जुयालने रौप्य पदक मिळवत एकाच स्पर्धेत प्रथमच दुहेरी पदकाची कमाई करण्याचा मान या जोडीने मिळविला. विशेष म्हणजे आजच्या दिवशी भारताच्या ५ लेकींनी ५ सुवर्ण पदके पटकावली. एकूण १० बॉक्सरनी पदकांची लयलूट केली.



प्रारंभी जॅस्मिनने अंतिम फेरीत उत्तर आयर्लंडच्या मायकेला वॉल्शचा तर प्रीतीने कॅनडाच्या सवाना डोलमागोचा पराभव केला. यासोबतच साक्षी चौधरीने इंग्लंडच्या रुबी व्हाईटला, साक्षी चौधरीची चुलत बहीण प्रिया घंघासने कॅनडाच्या मारी-बथूल अल-अहमदियेहला आणि अरुंधती चौधरीने इंग्लंडच्या शँटल रिडला पराभूत करून सुवर्ण पदक पटकावले. यासोबतच भारतीय बॉक्सर अंकुश पंघालने इंग्लंडच्या डिमेजी शिद्धूचा पराभव केला.
७५ किलो वजन गटात ही लढत झाली तर सचिन सिवाचने नामिबियाच्या ट्रायअगेन मॉर्नी न्देवेलोचा पराभव करीत आठवे सुवर्ण पदक मिळविले. ६० किलो वजन गटात ही लढत झाली. या आधी पॅरा शॉट पुटमध्ये सोमन राणाने सुवर्ण कमाई केली होती. त्यामुळे बॉक्सिंगचे ७ आणि पॅरा शॉटमधील १ अशा ८ सुवर्ण पदकांची आज भारताने कमाई केली.
भारतीय बॉक्सरनी आज सुरुवातीला २ सुवर्ण पदकांची कमाई करून दिली. त्याचवेळी ७ भारतीय बॉक्सरनी अंतिम फेरीत धडक मारली होती. त्यामुळे या बॉक्सरच्या कामगिरीकडे भारतीयांचे लक्ष लागले होते. या बॉक्सरनी भारतीयांचा विश्वास सार्थ ठरवित ७ सुवर्णची कमाई केली. यातील जादूमणी सिंग मांडेंगबाम (५५), लव्हलिना बोगोहेंन (७५) आणि नरेंद्र बेरवाल (९०) या तीन भारतीय बॉक्सरना रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. यासोबतच पॉरा शॉट पुट (गोळाफेक) मध्ये भारताच्या शुभम जुयाललाही रौप्य पदक मिळाले.

### एकाच प्रकारात २ पदकांची कमाई

भारताच्या सोमन राणाने पॅरा शॉट पुट (गोळाफेक) स्पर्धेच्या एफ-५७ गटात हंगामातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद करत सुवर्णपदक जिंकले. याच स्पर्धेत भारताच्याच शुभम जुयालने रौप्यपदक मिळवले.

### ट्रिपल जंपमध्ये आणखी २ पदके

पुरुष गटातील ट्रिपल जंप प्रकारात भारताने आणखी दोन पदके जिंकली आहेत. प्रवीण चित्रवेलने १६.५८ मीटरची उडी मारून रौप्य पदक पटकावले तर त्याचा सहकारी भारतीय खेळाडू सेल्वा प्रभूने १६.५२ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्य पदक जिंकले.

## राज्यातील 'नीट' आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू, गृह विभागाचे पोलिसांना पत्र

**वृत्तसंस्था, मुंबई**

नीट (यूजी) परीक्षेतील पेपर लीक आणि गैरप्रकाराविरोधात रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थी आणि तरुणांना आता मोठा दिलासा मिळणार आहे. आंदोलनात सहभागी झाल्यामुळे महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया राज्य सरकारने सुरू केली आहे. गृह विभागाने शुक्रवारी पत्राद्वारे पोलिसांना स्पष्ट निर्देश देत आंदोलकांवर कोणतीही कठोर कायदेशीर किंवा दंडात्मक कारवाई करू नये, असे सांगितले आहे.
नीट परीक्षेतील अनियमिततेविरोधात देशभरात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसह विविध शहरांमध्ये विद्यार्थी आणि तरुणांनी आंदोलन केले होते. या आंदोलनांमध्ये सहभागी झालेल्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. या विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होऊ नये, यासाठी राज्य सरकारने हे गुन्हे नियमानुसार मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.
महाराष्ट्राच्या गृह विभागाने पोलिस महासंचालकांना पाठवलेल्या पत्रात आंदोलनकर्त्यांबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थी, तरुण आणि इतर आंदोलकांविरोधात कोणतीही नवीन कठोर कारवाई करू नये. दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. संबंधित न्यायालयांची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी.
सरकारच्या आदेशानंतरही एफआयआर थेट रद्द होणार नाहीत. प्रत्येक प्रकरणाची सद्यस्थिती तपासून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

**विद्यार्थ्यांची मागणी होती पारदर्शकतेची**

नीट परीक्षेतील कथित पेपर लीक आणि गैरप्रकाराच्या आरोपांनंतर विद्यार्थ्यांनी परीक्षेतील पारदर्शकता, दोषींवर कारवाई आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे संरक्षण करण्याची मागणी केली होती. या प्रकरणाच्या चौकशीसाठी केंद्रीय तपास यंत्रणांनीही तपास सुरू केला होता. नीट परीक्षेतील गैरप्रकारांप्रकरणी सीबीआयने गुन्हा दाखल करून तपास केला होता.

**गुन्ह्यांमुळे भवितव्यावर परिणाम होण्याची भीती**

आंदोलनानंतर दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत विद्यार्थी संघटना आणि पालकांनी चिंता व्यक्त केली होती. पोलिस केस असल्यामुळे शिक्षण, नोकरी आणि भविष्यातील संधींवर परिणाम होण्याची भीती विद्यार्थ्यांना होती. याच पार्श्वभूमीवर शांततापूर्ण आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**न्यायालयाच्या मंजुरीनंतरच अंतिम निर्णय**

गृह विभागाच्या निर्देशानंतर प्रक्रिया सुरू झाली असली तरी गुन्हे मागे घेण्यासाठी संबंधित न्यायालयांची परवानगी आवश्यक असेल. त्यामुळे एफआयआर मागे घेण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागू शकतो. नीट आंदोलनात विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि मागण्या आता सरकारच्या निर्णयामुळे पुन्हा चर्चेत आल्या आहेत. गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थी आणि तरुणांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## मंत्र्यांची छापील वृत्तपत्रे बंद करण्याचा निर्णय अखेर मागे, २४ तासांत राज्य सरकारचा यू-टर्न !

**मुंबई :** मुख्यमंत्री वगळता अन्य मंत्र्यांची कार्यालये तसेच त्यांच्या शासकीय निवासस्थानावर येणारी छापील वृत्तपत्रे किंवा नियतकालिके बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र, वृत्तपत्रविक्रेत्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवल्याने सरकारने २४ तासांत यू- टर्न घेत हा निर्णय मागे घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी यासंदभार्तील सुधारित शासन निर्णय जारी केला. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयात अंशतः बदल केला असून गुरुवारी जाहीर करण्यात आलेली केवळ ऑनलाईन सदस्यत्वाची अट मागे घेण्यात आली आहे. आता सर्वच मंत्र्यांना ऑनलाईन किंवा मुद्रित कोणत्याही प्रकारच्या सदस्यत्वाचा पर्याय उपलब्ध असणार आहे. संबंधित मंत्र्यांसाठी वृत्तपत्रांचा पर्याय पुन्हा खुला झाला आहे.
सरकारने निर्णयात बदल करताना ३० जुलैच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये सुधारणा केली आहे. उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्री यांच्या कार्यालये तसेच शासकीय निवासस्थानी वृत्तपत्रे व नियतकालिकांसाठी ऑनलाईन किंवा मुद्रित यापैकी त्यांना सोयीचा वाटणारा पर्याय स्वीकारता येईल, असे स्पष्ट केले आहे. मूळ निर्णयानुसार, केवळ मुख्यमंत्र्यांना या निर्णयातून वगळण्यात आले होते. तर, एक सप्टेंबरपासून उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्री यांच्या कार्यालये व शासकीय निवासस्थानी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांचे सामान्य प्रशासन विभागाकडून होणारे वितरण बंद करण्यात येणार होते. त्याऐवजी संबंधित मंत्र्यांनी ऑनलाईन सदस्यत्व घ्यावे आणि त्याचा खर्च संबंधित खात्याच्या खर्चाच्या निधीतून करावा, असे निर्देश देण्यात आले होते.






## कुलगाममध्ये पुन्हा एकदा दहशतवादी हल्ला, धर्म विचारून झाडल्या गोळ्या; घडली पहलगामसारखी घटना

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दहशतवाद्यांनी दक्षिण काश्मीरमधील कुलगाममध्ये शुक्रवारी (३१ जुलै) वीटभट्टीवर काम करणाऱ्या छत्तीसगडमधील दोन स्थलांतरित मजुरांवर गोळ्या झाडल्याचा प्रकार समोर आला. यामध्ये दोघांचाही मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. कुलगाम जिल्ह्यातील केल्लम परिसरात ही घटना घडली असून यानंतर पोलिस यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घालत दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरू केली आहे. या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तोयबाने घेतली आहे.
जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील किल्लम परिसरात दहशतवादी हल्ला झाला. अज्ञात बंदूकधाऱ्यांनी २ जणांवर गोळीबार केला. या हल्ल्यात एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्या मजुराला नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण, उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे समोर आले. मृत तरुणांची ओळख २४ वर्षीय दीपक आणि २८ वर्षीय भूपेंद्र अशी पटली असून दोघेही छत्तीसगडचे रहिवासी आहेत.
या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हा हल्ला पहलगामच्या धर्तीवर झाला आहे. प्राथमिक तपासात समोर आले की, दहशतवाद्यांनी आधी स्थलांतरित मजुरांची नावे आणि जात विचारली. त्यानंतर त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. घटनेच्या वेळी तिथे अनेक स्थलांतरित मजूर उपस्थित होते.



सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसर सील केला असून हल्लेखोरांना शोधण्यासाठी शोधमोहीम सुरू केली आहे. जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला केला आहे. तसेच त्यांनी सुरक्षा दलांना शोधमोहीम तीव्र करण्याचे निर्देश दिले आहेत. ह्यकुलगाममधील अमानुष दहशतवादी हल्ल्यात छत्तीसगडच्या मजुरांचा मृत्यू झाला आहे. मी या भ्याड कृत्याचा तीव्र निषेध करतो. मी सुरक्षा दलांना आपली कारवाई तीव्र करून दहशतवाद्यांना ठार करण्याचे निर्देश दिले आहेत, असे सोशल मीडियावर पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या.
२२ जुलै रोजीही एका दहशतवाद्याने जम्मू-काश्मीरच्या पोलिसावर गोळी झाडल्याचा प्रकार समोर आला होता. अनंतनाग जिल्ह्यात अमरनाथ यात्रेच्या कर्तव्यावर तैनात असलेल्या जम्मू-काश्मीर पोलिस दलातील एका अधिकाऱ्यावर अगदी जवळून गोळी झाडण्यात आली होती. यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. दरम्यान, जम्मू-काश्मीरमध्ये बाहेरून आलेल्या कामगारांना लक्ष्य केल्याचे बोलले जात आहे.
केल्लम परिसरात झालेल्या गोळीबारानंतर १८ ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या घटनेची आठवण सर्वांनाच झाली. बिहारमधील बांका जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या ३० वर्षीय अशोक चौहान यांची शोपियान जिल्ह्यातील वाची परिसरात अज्ञात दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली होती.

संपादकीय लेखणीतून...

# मराठवाड्याला दिलासा

मुंबई, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर आता पावसाने मराठवाड्याकडे नजर वळवली असून पावसाचा जोर वाढू लागला आहे. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर गुरुवारी जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात अनेक ठिकाणी दमदार पाऊस झाला. या पावसामुळे खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून विदर्भातील अनेक भागात जोरदार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी चिंतेत होता. मात्र, गुरुवारी जालना, बदनापूर, अंबड, मंठा, घनसावंगी यासह जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे खरीप पिकांवरील उघडिपीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून पिकांना नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गुरुवारी नांदेड जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला. जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अमरावती जिल्ह्यातील सिपना नदीला पूर आला आहे. नदी-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने काही गावांचा संपर्क तुटला आहे.

पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळाला आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि इतर खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली आहे. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार असून पिकांच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. पावसाने काही काळ विश्रांती घेतल्याने पिकांच्या वाढीबाबत चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. काही भागात पावसाचा जोर कायम राहिल्यास शेतामध्ये पाणी साचण्याची शक्यता आहे. कमी उंचीच्या आणि निचऱ्याची सुविधा नसलेल्या शेतीतील पिकांवर परिणाम होऊ शकतो. मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी रिमझिम अथवा मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत आहेत. जुलै संपत आला तरी अजूनही काही भागात पेरण्या झालेल्या नाहीत. ढगाळ वातावरण तयार होत असले तरी बऱ्याच ठिकाणी पावसाची हुलकावणी पहायला मिळत होती. भूम आणि लोहारा तालुक्यात हलक्या सरी कोसळल्या तर उमरगा तालुक्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. तुळजापूर तालुक्यात भुरभुर तर परंडा, वाशी आणि कळंब तालुक्यात रिमझिम पाऊस झाला. बीड जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासाठी पुढील ५ दिवसांचा हवामान अंदाज जारी केला आहे. त्यानुसार विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट तर राज्यातील बहुतांश भागासाठी यलो व ग्रीन अलर्ट जारी करण्यात आला आहे. जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशिम, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागात यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या भागासाठी ग्रीन अलर्ट देण्यात आला आहे. या भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. मराठवाड्यात गुरुवारी सर्वदूर दमदार पाऊस झाला. नांदेड, लातूर, हिंगोली, जालना जिल्ह्यात पावसाचा जोर आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात जोरदार पाऊस झाला. गेल्या २४ तासांत छत्रपती संभाजीनगर ६.२ मिमी, जालना ५.१, बीड ६.२, लातूर १९.३, धाराशिव ३.४, नांदेड ३५.५, परभणी १४.१, हिंगोली २०.१ मिमी असा जिल्हानिहाय पाऊस झाला. विभागात एकूण १४.५ मिमी पावसाची नोंद झाली. विभागात आतापर्यंत सरासरी ३१४ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना फक्त २५८ मिमी पाऊस झाला आहे.

या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. मराठवाडा आणि विदभार्तील अनेक भागात पावसासाठी अनुकूल वातावरण असल्याने पुढील काही तासांत काही ठिकाणी जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. ६ ऑगस्टपर्यंत मराठवाडा, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही भागात नेहमीच्या सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. त्यानंतर पावसाचा जोर थोडा कमी होऊ शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील चार-पाच दिवस विदर्भासह मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात काही भागात जोरदार तर काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो. मराठवाड्यात अजूनही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे पुढचे दोन दिवस मराठवाड्यासाठी महत्त्वाचे आहेत. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे लातूर जिल्ह्यातील ४ लाख ३६ हजार ५७१ हेक्टरवरील खरीप पिकांना जीवदान मिळाले आहे. जून महिन्यात नगण्य पाऊस झाल्याने लातूर जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट पसरले होते. बुधवारपासून जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# पर्यावरणाचे रक्षण आणि कायदेविषयक सुसंवाद: सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल'

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

देशातील शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही आघाड्यांवर अत्यंत दूरगामी परिणाम करणारा एक ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२६ रोजी दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने केंद्र सरकारचे २०२१ चे 'कार्यालयीन ज्ञाप' पूर्णपणे रद्दबातल ठरवले आहे. या ऐतिहासिक निकालामुळे यापुढे कोणत्याही नवीन प्रकल्पाला पर्यावरण मंजुरीशिवाय काम सुरू करता येणार नाही, हे आता कायदेशीररीत्या स्पष्ट झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निकालात केंद्र सरकारचा २०२१ चा प्रशासकीय आदेश रद्द केला आहे, ज्याअन्वये पर्यावरण मंजुरीशिवाय सुरू झालेल्या प्रकल्पांना पिछली तारीख किंवा पूर्वलक्ष्यी प्रभावाने मंजुरी देण्याची कायमस्वरूपी मुभा देण्यात आली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, पर्यावरणाला आधी नुकसान पोहोचवून नंतर मंजुरी घेण्याची सरसकट पद्धत कायदेशीररित्या स्वीकारली जाणार नाही.

या वादाची पाळेमूळें केंद्र सरकारने ७ जुलै २०२१ रोजी जारी केलेल्या एका कार्यालयीन आदेशात होती. या आदेशानुसार, जर एखाद्या कंपनीने पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी न घेता प्रकल्पाचे काम सुरू केले किंवा ते पूर्ण केले, तर त्यांना नंतरच्या काळात पूर्वलक्ष्यी प्रभावाने) मंजुरी मिळवण्याची प्रशासकीय सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

या शिथिलतेमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचा आक्षेप घेत देशभरातून विविध पर्यावरण संस्था आणि कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अशा एकूण ४९ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सलग ६ दिवस मॅरेथॉन सुनावणी झाली. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करून न्यायालयाने १ एप्रिल २०२६ रोजी आपला निकाल राखून ठेवला होता, जो अखेर २९ जुलै २०२६ रोजी जाहीर करण्यात आला.

खंडपीठाने निकाल देताना स्पष्ट केले की, निसर्गाचे एकदा नुकसान झाल्यानंतर केवळ प्रशासकीय पत्रांचा आधार घेऊन ते नंतर वैध ठरवण्याची पद्धत कायदेशीररीत्या स्वीकारार्ह नाही.

न्यायालयाने आपले निकष स्पष्ट केले आहेत की, नवीन प्रकल्पांना पूर्वमंजुरी बंधनकारक कोणत्याही नवीन प्रकल्पाचे काम पर्यावरण विभागाच्या अधिकृत परवानगीशिवाय सुरू करता येणार नाही. 'आधी प्रकल्प आणि नंतर मंजुरी' हा प्रकार आता पूर्णपणे बंद होईल.

जुन्या प्रकल्पांना अभय, न्यायालयाने हा निकाल पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू न करता केवळ 'भविष्यासाठी' लागू केला आहे. याचा अर्थ २९ जुलै २०२६ पूर्वी ज्या प्रकल्पांनी जुन्या नियमांनुसार मंजुरी मिळवली आहे किंवा ज्यांचे काम आधीच सुरू आहे, ते पाडले जाणार नाहीत. यामुळे हजारो कोटींची गुंतवणूक असलेल्या प्रकल्पांना कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.

**प्रशासकीय आदेशांना चाप:** केंद्र सरकार केवळ एका साध्या कार्यालयीन पत्राद्वारे पर्यावरणाचे नियम शिथिल करू शकत नाही. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत आणि व्यापक जनहितासाठी अशी सवलत द्यायची असल्यास, सरकारला 'पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६' अंतर्गत रीतसर वैधानिक अधिसूचना काढावी लागेल आणि तीही केवळ मर्यादित कालावधीसाठी एकदाच लागू करता येईल.

**न्यायालयाचा विशेष अधिकार :** संविधानातील 'अनुच्छेद १४२' अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःचा विशेष अधिकार अबाधित ठेवला आहे. अत्यंत महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय हिताच्या प्रकल्पांना विशेष परिस्थितीत काम पूर्ण झाल्यानंतरही मंजुरी देण्याचा अधिकार केवळ न्यायालयाकडे असेल.

न्यायालयाने आपल्या निकालात 'पूर्वसावधगिरीच्या तत्त्वाचा' विशेष उल्लेख केला आहे. पर्यावरणाची हानी झाल्यानंतर केवळ दंड भरून किंवा फी देऊन ती भरून काढता येत नाही. डोंगरांचे झालेले उत्खनन, नद्यांचे बदललेले प्रवाह किंवा नष्ट झालेली जंगले ही केवळ कागदोपत्री दंड भरून पूर्ववत करता येत नाहीत, त्यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच त्याची तपासणी होणे अनिवार्य आहे, यावर न्यायालयाने भर दिला.

कॉर्पोरेट आणि उद्योग क्षेत्रावर होणारा परिणाम होऊ नये यासाठी या निकालामुळे आता कॉर्पोरेट क्षेत्राला आपल्या प्रकल्पांचे नियोजन अधिक शिस्तीत करावे लागेल. यापूर्वी अनेक कंपन्या परवानगी मिळण्यापूर्वीच घाईघाईने काम सुरू करत असत आणि नंतर प्रशासकीय पळवाटा शोधत असत. आता कंपन्यांना प्रकल्प सुरू करण्यापूर्वीच 'पर्यावरणीय आघात मूल्यमापन' प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. यामुळे प्रकल्पांच्या सुरुवातीच्या काळात काहीसा वेळ लागू शकतो, परंतु भविष्यातील कायदेशीर कटकटी आणि प्रकल्प अर्धवट लटकण्याचा धोका पूर्णपणे टळेल.

**स्थानिक पर्यावरण आणि समुदायांना संरक्षण:** हा निकाल देशातील नदी, नाले, डोंगर आणि जंगलांच्या कडेला राहणाऱ्या स्थानिक समुदायांसाठी अत्यंत दिलासादायक आहे. अनेकदा स्थानिक लोकांचा विरोध डावलून किंवा पर्यावरण परवानग्या प्रलंबित ठेवून प्रकल्प उभे राहायचे. आता कडक नियमांमुळे डोंगर कटिंग, झाडांची बेकायदेशीर कत्तल आणि जलस्रोतांचे प्रदूषण यावर मोठ्या प्रमाणात आळा बसेल.

शाश्वत विकासाचा हा नवा कायदेशीर रोडमॅप तयार करून सर्वोच्च न्यायालयाचा हा ऐतिहासिक निकाल केवळ पर्यावरणाची बाजू घेणारा नसून, तो भारताच्या भविष्यातील शाश्वत विकासाची नवी पायाभरणी करणारा एक परिपक्व दस्तऐवज आहे. न्यायालयाने हा निकाल 'पूर्वलक्षी' न ठेवता 'भविष्यासाठी' लागू करून एक अत्यंत प्रगल्भ कायदेशीर समतोल साधला आहे; ज्यामुळे आधीच सुरू असलेल्या हजारो कोटींच्या प्रकल्पांना अभय मिळाले असून देशाच्या आर्थिक गतीला आणि रोजगार निर्मितीला कोणताही धक्का बसणार नाही. दुसरीकडे, भविष्यातील सर्व नवीन प्रकल्पांसाठी पर्यावरण मंजुरी आधीच घेणे बंधनकारक केल्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील पळवाटा आणि मनमानी कारभाराला कायमचा चाप बसला आहे. निसर्गाचे एकदा नुकसान झाल्यावर केवळ कागदोपत्री दंड भरून ते वैध ठरवण्याची पद्धत आता इतिहासजमा झाली असून यामुळे जंगले, डोंगर आणि जलस्रोतांचे प्रभावी रक्षण होईल.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे केवळ पर्यावरणाचा विजय नाही, तर तो देशाच्या शाश्वत विकासाचा नवा रोडमॅप आहे. चालू प्रकल्पांना धक्का न लावल्यामुळे देशाच्या आर्थिक गतीला खिळ बसणार नाही, तर दुसरीकडे नवीन प्रकल्पांसाठी कडक नियम केल्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी निसर्गाचे रक्षण होईल. सर्वोच्च न्यायालयाने या निकालाद्वारे भारताला "निसर्गाचा बळी न देता, भविष्यातील पिढ्यांचे हक्क अबाधित ठेवून विकास साधण्याचा" एक अत्यंत व्यावहारिक आणि कायदेशीर मार्ग दाखवून दिला आहे.

- ९५६१५९४३०६

# टिम इंडिया कसोटी संघातील नवा चेहरा सारांश जैनचा प्रेरणादायी प्रवास!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी १५ सदस्यांच्या भारतीय संघाची घोषणा केली आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली जाहीर झालेल्या या संघात सर्वात लक्षवेधी ठरली ती मध्य प्रदेशच्या ३३ वर्षीय अष्टपैलू सारांश सुबोध जैन याची निवड! दीर्घकाळ देशांतर्गत क्रिकेटमध्ये खोऱ्याने बळी आणि धावा घेणाऱ्या सारांशला अखेर भारतीय कसोटी संघात प्रथमच स्थान मिळाले आहे. या निवडीमुळे केवळ त्याच्या कौटुंबिक स्वप्नाची पूर्तता झाली नाही, तर भारतीय क्रिकेटमध्ये एका नव्या इतिहासाची नोंद झाली आहे.

**वडिलांचा वारसा आणि कठीण संघर्षाची गाथा**

३१ मार्च १९९३ रोजी इंदूरमध्ये जन्मलेल्या सारांशच्या रक्तातच क्रिकेट आहे. त्याचे वडील सुबोध जैन हे मध्य प्रदेशचे माजी रणजी खेळाडू राहिले आहेत. वडिलांनीच सारांशच्या हातात बॅट आणि बॉल देऊन त्याच्यातील क्रिकेटपटू घडवला.

मात्र, सारांशचा इथपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. २०१४ मध्ये जेव्हा सारांश ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर होता, तेव्हा त्याच्या वडिलांना कर्करोगाचे (कॅन्सर) निदान झाले होते. सारांशचे लक्ष विचलित होऊ नये म्हणून कुटुंबाने ही गोष्ट त्याच्यापासून लपवून ठेवली होती. भारतात परतल्यानंतरच त्याला ही माहिती मिळाली. कौटुंबिक अडचणी आणि त्यागाची किनार असलेल्या या संघषार्तून मार्ग काढत त्याने मैदानावर चमकदार कामगिरी सुरूच ठेवली.

**कसोटी संघात कशी मिळाली संधी?**

ऑफ-स्पिनिंग अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरच्या पायाच्या स्नायूला (हॅमस्ट्रिंग) दुखापत झाल्याने तो या मालिकेतून बाहेर पडला. श्रीलंकेच्या संघात डाव्या हाताच्या फलंदाजांची संख्या जास्त असल्याने भारतीय निवड समितीला एका प्रभावी ऑफ-स्पिनरची गरज होती.

सारांशने नुकत्याच झालेल्या 'भारत अ' संघाच्या श्रीलंका दौऱ्यात यजमान 'श्रीलंका अ' विरुद्ध दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात नाबाद ७० धावा आणि ६ बळी टिपले होते. श्रीलंकेतील खेळपट्ट्यांवर त्याची ही कामगिरी आणि देशांतर्गत क्रिकेटमधील सातत्य पाहून निवड समितीने ३३ वर्षीय या खेळाडूवर विश्वास दाखवला.

**देशांतर्गत क्रिकेटमधील दमदार कामगिरी**

डाव्या हाताने फलंदाजी आणि उजव्या हाताने ऑफ-ब्रेक गोलंदाजी करणाऱ्या सारांशने प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये आपल्या अष्टपैलू क्षमतेची छाप पाडली आहे:

प्रथम-श्रेणी सामने (प्रथम श्रेणी): ५४ सामने

धावा: २,२२३ धावा (२ शतके, १४ अर्धशतके)

बळी: १८८ बळी (१० वेळा एका डावात ५ बळी)

२०२५-२६ च्या दुलीप ट्रॉफीमध्ये मध्य विभागाकडून (सेंट्रल झोन) खेळताना त्याने अवघ्या २ सामन्यांत १६ बळी घेतले होते आणि दोन्ही सामन्यांत मोक्याच्या क्षणी अर्धशतके ठोकत 'प्लेअर ऑफ द सिरीज'चा किताब पटकावला होता.

**सारांश पदार्पण करेल, पण तो भारताचा 'सर्वात वयस्कर' कसोटीपटू ठरेल का?**

सारांश जैनच्या निवडीनंतर "तो भारताचा सर्वात वयस्कर कसोटीपटू ठरेल का?" असा प्रश्न विचारला जात आहे. आकडेवारीचा विचार केल्यास ही गोष्ट पूर्ण सत्य नाही, परंतु या शतकातील तो एक मोठा अपवाद ठरणार आहे.

**भारताचा 'सर्वकालीन' इतिहास काय सांगतो?**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात ३५ ते ४० पेक्षा जास्त वयात कसोटी पदार्पण करणारे अनेक खेळाडू होऊन गेले आहेत:

रुस्तमजी जमशेदजी: भारतासाठी सर्वात जास्त वयात कसोटी पदार्पण करण्याचा विक्रम रुस्तमजी जमशेदजी यांच्या नावावर आहे. त्यांनी १९३३ मध्ये वयाच्या ४१ वर्षे २७ दिवस या वयात पहिला कसोटी सामना खेळला होता.

कोटर रामास्वामी: १९३६ मध्ये त्यांनी वयाच्या ४० वर्षे ३९ दिवस या वयात पदार्पण केले.

सी. के. नायडू: भारताचे पहिले कर्णधार सी. के. नायडू यांनी १९३२ मध्ये ३६ वर्षे २९५ दिवस वय असताना पदार्पण केले होते.

**२८ वर्षांनंतर घडणारा ऐतिहासिक क्षण**

जरी सारांश सर्वकालीन विक्रम मोडत नसला, तरी आधुनिक (मॉडर्न इरा) भारतीय क्रिकेटच्या दृष्टीने त्याची निवड ऐतिहासिक ठरते:

२८ वर्षांचा मोठा खंड: - भारतासाठी ३३ हून अधिक वय असताना कसोटी पदार्पण करणारा शेवटचा खेळाडू रॉबिन सिंग होता. रॉबिन सिंगने ऑक्टोबर १९९८ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध वयाच्या ३५ व्या वर्षी कसोटी पदार्पण केले होते.

२१ व्या शतकातील विक्रम:- गेल्या २८ वर्षांत कोणत्याही ३३+ वयाच्या खेळाडूला भारतात नव्याने कसोटी पदार्पणाची संधी मिळालेली नाही. त्यामुळे २१ व्या शतकात भारताकडून कसोटी पदार्पण करणारा सारांश जैन हा सर्वात वयस्कर खेळाडू ठरणार आहे.

**श्रीलंका दौऱ्याचे वेळापत्रक**

भारतीय संघ या मालिकेत दोन कसोटी आणि एक सराव सामना खेळणार आहे:

चार दिवसीय सराव सामना: ७ ते १० ऑगस्ट (कोलंबो)

पहिली कसोटी: १५ ते १९ ऑगस्ट (गाले)

दुसरी कसोटी: २३ ते २७ ऑगस्ट (कोलंबो)

श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघ:

शुभमन गिल (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, रिषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुथार, सारांश जैन, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार.

**थोडक्यात सांगायचे तर...**

सारांश जैन हा भारताचा सर्वकालीन सर्वात वयस्कर कसोटीपटू ठरणार नसला, तरी तरुण खेळाडूंना प्राधान्य देणाऱ्या आधुनिक क्रिकेटच्या युगात ३३ व्या वर्षी भारतीय संघात स्थान मिळवून त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये राबणाऱ्या शेकडो खेळाडूंमध्ये एक नवा विश्वास निर्माण केला आहे.

- ९०९६३७२०८२

# "जेन-झी जनरेशन गटार आहे"म्हणतांना कंगनाला थोडीशी तरी वाटायला पाहिजे!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

जेन-झी पिढीला गटार पिढी आहे,म्हणणाऱ्या कंगनाने स्वतःचा चेहरा आरश्यात पहावा नंतर समजेल कोण गटार आहे आणि कोण शुद्ध आहे.कंगना रानावत लोकप्रतिनिधी आहेत आणि त्या देशाचे नेतृत्व करीत आहे अशा परिस्थितीत आपण काय बोलतो याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.सर्वसामान्य जनता बोलतांना आपल्या जिभेवर थोडासा तरी ताबा ठेवतो.परंतु कंगनाला स्वतःच्या बोलण्यावर भान नसल्याचे दिसून येते. कंगना रानावत म्हणते की, पाश्चात्य प्रभावाखालील भारतीय महिलांची नवी पिढी "जनरेशन गटर" आहे.

कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे की,भारतात पाश्चात्य पध्दतीचा प्रभाव चित्रपट सृष्टीपासून वाढला आहे आणि त्यात आपणही सहभागी होता आणि आहात. सध्याच्या चित्रपटांमध्ये पाश्चात्य पध्दती प्रभावशाली होत आहे हे तुम्हाला दिसत नाही का? त्यामुळे हिंदू संस्कृतीचे वाटोळे होत आहे हे लक्षात येत नाही का? अशा परिस्थितीत तुम्ही पाश्चात्य पध्दतीचा संसदेत विरोध का करीत नाही? परंतु अभद्र वक्तव्य करून कंगनाने लोकप्रतिनिधी या पदाला कलंकित केले आहेत. जेन-झीचे आंदोलन तब्बल ३५ दिवस चालले आणि सरकारच्या माध्यमातून ३६ व्या दिवशी तोडगा निघाला.

या आंदोलना दरम्यान सोनम वांगचूक यांनी उपोषण सुध्दा केले व अनेक सामाजिक संघटनांनी आणि विरोधी पक्षांनी पुर्णपणे समर्थन दिले. यावर तोडगा काढण्यासाठी सरकार मार्फत तीन फेऱ्यांच्या चर्चा झाल्या आणि सरकार सुध्दा कॉकरोच जनता पार्टी समोर झुकले. पक्ष-विपक्ष व सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील होते.हे सर्व झाल्यानंतर आणि तोडगा निघाल्यानंतर युवा पिढी बद्दल घाणेरड्या दजार्चे वक्तव्य करने एका लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही असे मला वाटते.

कंगनाने याचा विचार केला का की, लाखो युवा रस्त्यावर का आले? त्यांच्या भावनांना किती मोठी ठेस पोहोचली असावी याचा विचार केला का? युवकांच्या भावनांचा थोडासाही विचार न करता आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी वाटेल ते घाणेरडे वक्तव्य एखाद्या लोकप्रतिनिधीने करने म्हणजे लोकशाहीला काळीमा फासणारे म्हणावे लागेल. जंतमंतरचे आंदोलन चित्रपट नसून लोकशाही आहे हे कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे. आज पेपर फुटीमुळे देशाच्या शिक्षण प्रणालीवर मोठा काळा धब्बा लागला आहे आणि ही घटना संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली. कारण राजकीय पुढाऱ्यांचे मुले विदेशात शिकतात ते कंगणाला दिसत नाही का? आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांना आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालयाल शिकवायला लाज वाटते. राजकीय पुढाऱ्यांचे मुले जर सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकली असती तर देशात पेपर फुटीचा प्रकार दिसलाच नसता व जेन-झी रस्त्यावर आल्याचे दिसले नसते.

राजकिय पुढाऱ्यांचे मुले विदेशात आणि सर्वसामान्यांची मुले देशात शिकत आहे आणि त्यातही पेपर फुटी या असहय्य वेदना युवकांना कशा काय सहन होणार? आज जेन-झी देशाचे भविष्य आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज युवकांना काय वेदना होत आहे याची जाण कंगणाला नसावी.जेन-झीने जे काही केले ते आत्म्यातुन केले आणि कंगना जे घृणास्पद वक्तव्य केले ते राजकीय प्रेरीत आहे ही बाब कंगना राणावत ने लक्षात ठेवली पाहिजे आणि गटार जेन-झी आहे की स्वतः कंगना आहे हे सरकारने ठरवून कंगना राणावतच्या घृणास्पद वक्तव्यावर लगाम कसली पाहिजे. कंगना राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख "गटार पिढी" असा करून युवकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले.

कंगना रानावत यांनी जेन-झीचा उल्लेख "गटार पिढी"असा केला आणि त्यांच्या ध्वनि चित्रफिती पाहून आपल्याला मळमळते, ओकाऱ्या येते असे इन्स्टाग्रामवर लिहिले."जंतरमंतर येथे झालेली निदर्शने घाणं, कचरा आणि कुरूपतेचे दर्शन होते,असे रानावत यांनी म्हटले आहे.सोशल मीडियावर जेन-झीचे व्हायरल रील्स पाहून मला ओकारी आल्यासारखे वाटते.हे लोक ड्रग्स आणि दारू पिण्याच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगत आहेत.

कंगना रानावतला दारू आणि ड्रग्स सारख्या नशेली पदार्थांची एवढी घृणा वाटत आहे तर आतापर्यंत सरकारने किंवा कंगनाने दारू बंदी किंवा नशेली पदार्थांबद्दल आवाज का उठवला नाही व दारू किंवा नशेली पदार्थांच्या फॅक्टऱ्या बंद का केल्या नाहीत. आपण काय बोलतो याचे भान रानावत यांनी ठेवले पाहिजे.

जेन-झीच्या आंदोलनावर सरकार एकीकडे तोडगा काढत आहे तर, दुसरीकडे कंगना रानावत सीजेपीच्या आंदोलनावर अभद्र भाषा बोलुन युवा पिढीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे ही बाब लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही.कंगना म्हणते कॉकरोच गंघगी पसरवित आहे, कंगनाजी आपण थोड्या चुकलात कॉकरोच गंधगी पसरवित नसुन गंधगी साफ करण्याचे काम करीत आहेत आणि करून दाखवले म्हणून तुम्हाला कॉकरोच गटार वाटत आहे.चित्रपटामध्ये काहीही बोलले तर चालते,परंतु इथे कृती करून दाखवावी लागते. कॉकरोच जनता पार्टी सहजच तयार झाली नसुन तुम्ही चुका केल्या म्हणून ती तयार झाली आहे आणि तुमच्या चुकांचे निराकरण करण्यासाठी ते ठाम आहेत.

कंगना म्हणते की,"मैने अपनी जिंदगी मे कभी किसी एक जगह पर इतना भद्दापन नहीं देखा" बरोबर आहे आपण पाहुही शकत नाही.कारण आतापर्यंत तुम्ही चित्रपटांमध्ये काम करायच्या आता तुम्हाला लोकांमध्ये करावे लागत आहे आणि लोकांनामध्ये काम करतांना कसे बोलावे याचा तुम्हाला अभ्यास नसावा.कारण तुमच्या वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी सुद्धा नाराजगी व्यक्त करीत आहे. जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अवैध दारू माफियांवर जलालखेडा पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'

## बानोरचंद्र येथे ६६ हजारांचा मुद्देमाल जप्त, तिघांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल, १ हजार लिटर मोहफुलाचा सडवा, १०५ लिटर गावठी दारू व साहित्य जप्त, ठाणेदार पवन बांबुलकर यांचा अवैध धंदेवाल्यांना कडक इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात जलालखेडा पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली असून, शनिवारी बानोरचंद्र येथे केलेल्या कारवाईत ६६ हजार ७०० रुपयांचा अवैध दारूसाठा व साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, अशा धंद्यांवर यापुढे आणखी कठोर कारवाई होणार असल्याचा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला आहे.





गुप्त माहितीच्या आधारे ठाणेदार पवन बांबुलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने बानोरचंद्र (ता. नरखेड) येथील शेतशिवार व गावातील संशयित ठिकाणी छापा टाकला. आरोपींच्या घराची झडती घेतली असता १०५ लिटर मोहफुलाची गावठी दारू (किंमत १०,५०० रुपये), १ हजार लिटर मोहफुलाचा सडवा (किंमत ५० हजार रुपये), देशी दारूच्या ३० बाटल्या (किंमत १,२०० रुपये) तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे पाच लोखंडी ड्रम (किंमत ५ हजार रुपये) असा एकूण ६६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी विजयसिंग जतनसिंग भोंड, लडूशिंग बावरी आणि एका महिलेविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये तीन स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले असून पुढील तपास जलालखेडा पोलीस करीत आहेत.

ठाणेदार पवन बांबुलकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांविरोधात सातत्याने धडक कारवाया सुरू असून, गावठी दारू निर्मिती, विक्री, जुगार व इतर बेकायदेशीर व्यवसायांवर पोलिसांची करडी नजर आहे. "कायद्याला आव्हान देणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला असून नागरिकांनीही अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. ही कारवाई ठाणेदार पवन बांबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आशिष हिरुडकर, निलेश खेरडे, मनीष ठाकरे, प्रेम काकडे तसेच होमगार्ड धनंजय निकोसे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# माळी महासंघ नागपूरतर्फे गुणवंत विद्यार्थी, प्राविण्य प्राप्त मान्यवर व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा गुणगौरव सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

माळी महासंघ, नागपूरच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्राविण्य प्राप्त केलेले मान्यवर तसेच नवनिर्वाचित जनप्रतिनिधी यांच्या सन्मानार्थ रविवारी २ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता. श्रीगुरुदेव सेवाश्रम, रमण विज्ञान केंद्राजवळ, आग्याराम चौक येथे भव्य गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अविनाश ठाकरे (राष्ट्रीय अध्यक्ष, माळी महासंघ तथा सदस्य, उच्चस्तरीय समिती, केंद्र सरकार) हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. कमलकिशोर फुटाणे (अतिरिक्त मुख्याधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर) यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रशांत वावगे (व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी, महाराष्ट्र राज्य) तसेच डॉ. मेघना वासणकर बगडे (उपायुक्त, शिक्षण विभाग, महानगरपालिका, नागपूर) उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रमुख



अतिथी म्हणून रविंद्र अंबाडकर (राष्ट्रीय सचिव, माळी महासंघ तथा सरचिटणीस, महात्मा फुले शिक्षण संस्था) आणि अरुण तिखे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, माळी महासंघ) उपस्थित राहतील. तसेच विशेष अतिथी म्हणून रश्मी तेलेवार वावगे (मुख्य लेख व वित्त अधिकारी, वनार्टी, महाराष्ट्र राज्य) आणि मुकुंदराव पोटदुखे (विभागीय अध्यक्ष, माळी महासंघ) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळ्यात समाजातील शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थी, प्राविण्य प्राप्त मान्यवर आणि नवनिर्वाचित जनप्रतिनिधींचा सन्मान करण्यात येणार असून, समाजातील नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

माळी महासंघ, नागपूर शहराचे अध्यक्ष शंकर चौधरी यांनी समाजबांधव, पालक, विद्यार्थी व नागरिकांनी या गुणगौरव सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

## गरंडा शाळेत लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गरंडा येथे ओळख थोरांची उपक्रम अंतर्गत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष श्रावण मोंढे यांचे हस्ते लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक खुशाल कापसे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तर सहाय्यक शिक्षक ओंकार पाटील यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच असे इंग्रजांना ठणकावून सांगणारे भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन चरित्राविषयी माहिती कथन केली.

# विदर्भ खैरे कुणबी विवाह मंचाची वार्षिक सभा संपन्न, नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ खैरे कुणबी विवाह मंचाची सन २०२६ ची वार्षिक सभा सोमवारी २० जुलैला महाजन साहेब यांच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेमध्ये मंचाच्या आगामी वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.



सन २०१९ पासून समाजहितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या विदर्भ खैरे कुणबी विवाह मंचाने समाजातील विवाह इच्छुक युवक-युवती व त्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन आणि समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असून, आगामी काळातही ही सेवा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. यासभेत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्ष- स्वप्निल रोहणकर- उपाध्यक्ष- सुरेखा रडके- संघटक-महादेव वैद्य- सचिव-डॉ. प्रदीप महाजन सहसचिव-डॉ. तुकारामजी धोबे, कोषाध्यक्ष-पुंडलिक ठाकरे, सहकोषाध्यक्ष- राजीव धानोरकर- सदस्य- रामरतन देशमुख, विलास चिंचोलकर, पंकज कोटगुले व उमेश नवघरे. हि निवड अभय जिचकार, महादेव वैद्य, मोहन डंभारे, टेमराज माले, डॉ. प्रदीप महाजन, स्वप्निल रोहणकर, विनायक म्हस्के, रामरतन देशमुख, सुनील मगरे, दिलीप शहारे, विलास चिंचोलकर, सुरेखा रडके, प्रगती महाजन, कल्पना रडके, उषा देशमुख आणि संगीता पुसदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी समाजाच्या हितासाठी विविध उपक्रम राबविणे, विवाह मंचाची कार्यव्याप्ती वाढविणे, युवक-युवती व पालकांना अधिक प्रभावी सेवा उपलब्ध करून देणे तसेच समाजातील एकोप्याला बळकटी देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

उपस्थित सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली विवाह मंच समाजहिताचे कार्य अधिक जोमाने व प्रभावीपणे पुढे नेईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अण्णाभाऊ साठेंच्या स्मृतींना अभिजात सन्मान मिळावा : जयदीप कवाडे

## पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे भव्य सामाजिक रॅली, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना शासनाच्या धोरणांत स्थान देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने नागपुरात भव्य सामाजिक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. दीक्षाभूमी येथून प्रारंभ झालेल्या या रॅलीचा समारोप अण्णाभाऊ साठे चौक येथे झाला. रॅलीपूर्वी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीपभाई कवाडे यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी उपस्थितांना संबोधित करताना जयदीप कवाडे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर वंचित, शोषित, श्रमिक, भटक्या-विमुक्त समाजाच्या संघर्षाला शब्दबद्ध करणारे सामाजिक क्रांतिकारक होते. त्यांच्या स्मृतींना केवळ औपचारिक अभिवादन न करता त्यांना अभिजात सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब शासनाच्या धोरणांमध्ये दिसले, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. कवाडे यांनी राज्य शासनाकडे अण्णाभाऊ साठे यांच्या मुंबईतील ऐतिहासिक वास्तूला स्मारकाचा दर्जा देण्याची जोरदार मागणी केली. ही वास्तू त्यांच्या संघर्षमय जीवनाची साक्ष असून ती प्रेरणास्थळ म्हणून विकसित व्हावी, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर नागपूरच्या दीक्षाभूमी परिसरात अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीला समर्पित भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने सुरू असलेल्या विविध शासकीय योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून त्या प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. सध्या अनेक योजना निधीअभावी अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या विकासासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी. जयदीप कवाडे यांनी वडार, बंजारा, पारधी, कंजरभाट, गोंधळी तसेच इतर भटक्या-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली. शिक्षण, रोजगार, उद्योग, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायासाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमात बोलताना त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचा गौरव करत सांगितले की, अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून अन्यायग्रस्त समाजाला संघर्षाची दिशा दिली. समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. रॅलीदरम्यान "अण्णाभाऊ अमर रहे", "सामाजिक न्याय आमचा हक्क आहे", "अण्णाभाऊ यांच्या विचारांना शासनमान्यता द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मोठ्या संख्येने युवक, महिला आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते या रॅलीत सहभागी झाले होते.

याप्रसंगी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे, प्रदेश संघटक कपिल लिंगायत, शहराध्यक्ष कैलास बोंबले, शहर कार्याध्यक्ष संजय सूर्यवंशी, शहर महासचिव दिलीप पाटील, पूर्व विदर्भ महासचिव डॅनी शामकुंवर, दक्षिण-पश्चिम अध्यक्ष स्वप्निल महाल्ले, दक्षिण-पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष श्रेयस गडले, प्रवेश ठवरे, प्रजोत कांबळे, सोमेश काले यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जयदीप कवाडे यांनी सांगितले की, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा सन्मान केवळ घोषणांमधून किंवा सोशल मीडियावरील पोस्टमधून होणार नाही. त्यांच्या विचारांना शासनाच्या धोरणांमध्ये, सामाजिक उपक्रमांमध्ये आणि विकासाच्या योजनांमध्ये स्थान मिळाले, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर आधारित सामाजिक परिवर्तनाचा लढा आणखी व्यापक व निर्णायक करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहभागी नागरिकांचे आभार मानण्यात आले.

थोडक्यात

## सेठ केसरिमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक-पालक सभा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरिमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहाट हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य व्ही. बी. वंजारी तसेच पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे उपस्थित होते.सभेदरम्यान पालक व शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती, शिस्त, उपस्थिती तसेच सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. याचप्रसंगी पालक-शिक्षक कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित पालकांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे संयोजक एल. डी. मसुरकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नागपुरे सर यांनी केले, तर श्री. मते यांनी आभार प्रदर्शन केले.

## प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर साहस स्मरण सप्ताहानिमित्त प्रेरणादायी व्याख्यान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक समिती, नागपूरतर्फे दरवर्षी ८ जुलै हा दिवस "साहस दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने संपूर्ण जुलै महिन्यात नागपूरातील विविध शाळांमध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या राष्ट्रकार्य, क्रांतिकारी विचार व प्रेरणादायी जीवनचरित्राचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी अभ्यासू व्याख्यात्यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत ३१ जुलै रोजी, सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटीच्या प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर, नागपूर येथे सुप्रसिद्ध व्याख्यात्या व सावरकर अभ्यासक सौ. शुभा साठे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अद्वितीय जीवनकार्य, राष्ट्रभक्ती, साहस, त्याग आणि स्वातंत्र्यलढ्यातील अमूल्य योगदान याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी हे व्याख्यान उत्स्फूर्तपणे ऐकत विविध प्रश्न विचारून संवादही साधला. यावेळी राजेंद्र बेनोडेकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक समितीच्या विविध सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रप्रेरणादायी उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष भालचंद्र कागभट तसेच शाळेच्या प्राचार्या वंदना कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे नियोजन भालचंद्र कागभट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या वंदना कुलकर्णी, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी व्याख्यात्या शुभा साठे यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी राष्ट्रप्रेम, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश देणाऱ्या या व्याख्यानाचे कौतुक केले.

## मराठा लान्सर काटोलतर्फे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा, कबड्डी खेळाडूंची उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

येथील स्थानिक मराठा लान्सर क्रीडा मंडळाच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सवाचे अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीमध्ये गुरूला असलेले सर्वोच्च स्थान आणि खेळाडूंच्या जीवनातील प्रशिक्षक व मार्गदर्शकांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा स्थानिक नबीरा कॉलेजच्या मैदानावर आणि त्यानंतर हॉलमध्ये अतिशय दिमाखात संपन्न झाला. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून परिसरातील नामांकित आणि आदरणीय व्यक्तिमत्त्वे उपस्थित होती. यामध्ये प्रामुख्याने अशोक राऊत, सुभाषजी कोठे, संजयजी जगदळे, देवीजी कामडी,संजय धोटे,अनिलजी कोठे मोहनजी तायडे, अजयजी धोटे,राजुजी जगताप,राजुजी गावंडे,काका काळे, सुरेशजी धोटे, सचिनजी उमप, प्रवीणजी गोतमारे, कैलासजी देशमुख, सचिन महाजन,विजय महाजन,नितीन ढवळे, विनोद नौकरीया, रवी नारनावरे, मनीष माढरे, संकेत जोगेकर आणि दुगार्दास देव्हारे यांचा समावेश होता तसेच मोठया संख्येत खेळाडू उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि क्रीडा क्षेत्रासह जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर गुरूचे मार्गदर्शन कसे दिशादर्शक ठरते, यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण मराठा लान्सरचे उदयोन्मुख व अनुभवी कबड्डी खेळाडू होते. खेळाडूंनी आपल्या गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांचे आशीर्वाद घेतले. मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात आले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या सर्व सदस्यांनी व क्रीडाप्रेमींनी परिश्रम घेतले.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## ज्योती सावित्री बहुउद्देशीय संस्थेतर्फे अण्णाभाऊ साठेंना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

साहित्यभूषण, लोकशाहीर तथा साहित्यसम्राट तुकाराम उर्फ अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त ज्योती सावित्री बहुउद्देशीय संस्था व जैमिनीकडू मित्र परिवार या संस्थाच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठेंनी साहित्य, पोवाडे, लोकनाट्य, वगनाट्य, कथा, कादंबऱ्या आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी वर्गाच्या वेदनांना वाचा फोडत समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिल्याचे प्रतिपादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यांच्या साहित्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शिक्षण, संघर्ष आणि संघटन हीच समाजपरिवर्तनाची खरी ताकत असून अण्णाभाऊंचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी शैलजैमिनी (सचिव), कृष्णा खोब्रागडे (उपाध्यक्ष), डॉ. राम कोल्हे, शालिनी सव्वालाखे, संगीता महल्ले, लीना पाटील, अजय पाटील, देवराव उजवणे, हिमांशू एकदारे, दिनकर धाबेकर, चंदन सुखदेवे, ज्ञानेश विदरे, शालिनी रणदिवे तसेच संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कायार्चा आदर्श घेऊन सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाचे आयोजन ज्योती सावित्री बहुउद्देशीय संस्थेतर्फे करण्यात आले असून शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त भाकप व माकपतर्फे अभिवादन रॅली




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली कॉटन मार्केट येथील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन सीताबर्डी मार्केट मार्गे व्हरायटी चौक येथे पोहोचली. रॅलीत मोठ्या संख्येने पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते. व्हेरायटी चौक येथे आयोजित सभेत कॉ.अरुण लाटकर व कॉ. डॉ. युगल रायलू यांनी मार्गदर्शन केले. कॉ. अरुण लाटकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. तर कॉ. डॉ. युगल रायलू यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये, त्यांचे विचार आणि समाजप्रबोधनातील योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी त्यांनी सांगितले की, अण्णाभाऊ साठे हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण भारताचे भूषण आहेत. त्यांच्या कार्याचा जागतिक स्तरावर गौरव झाला असून रशियातील मॉस्को येथे त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. रॅलीनंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दीक्षाभूमी परिसरातील अण्णाभाऊ साठे स्मरणस्थळी जाऊन त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कॉम. रवींद्र पराते, कॉम. सुनिल शेंडे, कॉम. अजय साहू, कॉम. मनोहर मुळे आणि श्याम काळे यांची उपस्थिती होती.

## आमचा संगतीत- पंगतीत राहिलेला मातंग समाज दूर जाऊ शकत नाही : नारायण बागडे




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोकशाहीर तथा साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध, मातंग, चर्मकार व वाल्मीकी भाईचारा ऐक्य संदेश अभियान अंतर्गत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चातर्फे अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात आॅरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी समाजातील ऐक्य व सामाजिक परिवर्तनावर भाष्य केले. यावेळी बोलतांना नारायण बागडे म्हणाले, "ज्यांना कधीकाळी आमच्या सावलीचाही विटाळ वाटत होता, त्यांच्याकडून भाकरीचा तुकडाही मिळणे दूरची गोष्ट होती. अशा काळात आमचा पूर्वीचा महार समाजच आमचा सखा ठरला. त्यांनी आम्हाला संगतीत आणि पंगतीत स्थान दिले, हा इतिहास विसरता कामा नये.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' हा परिवर्तनाचा संदेश दिला. मात्र आजही काही लोक हा संदेश मनापासून स्वीकारत नाहीत," असे मार्मिक उद्गार त्यांनी काढले. या अभियानाचे नेतृत्व आंबेडकरी मातंग मोर्चाचे मनोहर इंगोले, वाल्मीकी समाजाचे नेते रमेश डकाह, चर्मकार समाजाचे नेते अँड. राजकुमार शेंडे तसेच प्रा. रमेश दुपारे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जयदेव चिंवडे यांच्या हस्ते साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रवीण आवळे, चरणदास गायकवाड, राजू पांजरे, के. टी. कांबळे, नरेश खन्ना यांच्यासह विविध समाजघटकांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'शुन्य अपघात'साठी केंद्र सरकारच्या कठोर उपाययोजना

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती, 'शुन्य अपघात, माझी जबाबदारी' या विषयावर राष्ट्रीय अधिवेशन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अपघातांची संख्या कमी करण्यासाठी तसेच अपघातांमधील मृत्यू टाळण्यासाठी केंद्र सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यावर अंमलबजावणी देखील सुरू झाली आहे. यामध्ये नागरिकांचीही सकारात्मक साथ मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज, शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी केले.

ऑल इंडिया फेडरेशन ऑफ ड्रायव्हिंग स्कुल असोसिएशनशी संलग्नित महाराष्ट्र राज्य मोटर ड्रायव्हिंग स्कुल मालक संघटनेच्या वतीने कविवर्य सुरेश भट सभागृ 'शुन्य अपघात, माझी जबाबदारी' या विषयावर राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

गडकरी म्हणाले, आपल्या देशात वर्षाला पाच लाख लोक अपघातांमध्ये जखमी होतात, तर जवळपास दीड लाख लोकांचा मृत्यू होतो. यामध्ये १८ ते ३५ वर्षे वयोगटातील नागरिकांची संख्या ६६ टक्के आहे, ही दुर्दैवी बाब आहे. रस्ते अपघातासाठी रोड इंजिनियरिंग, ऑटोमोबाईल इंजिनियरिंग, मानवी चुका आदी कारणे आहेत. कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे. ती केली सुद्धा जाते. पण बरेचदा कायद्याप्रती आदर नाही आणि भीतीही नाही, अशी परिस्थिती असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अपघात रोखण्यात व्यवस्थेतील प्रत्येक घटकाची सारखी जबाबदारी आहे.

अपघात झाल्यास जखमीला हॉस्पिटलमध्ये पोहोचवून तातडीने उपचार मिळवून देणाऱ्या 'राहगीर'ला केंद्र सरकारच्या वतीने २५ हजार रुपयांचा पुरस्कार देण्याची आम्ही तरतूद केली आहे. याशिवाय अपघातामधील जखमी नागरिकाला १ लाख ५० हजार रुपयांपर्यंतच्या आर्थिक मदतीची देखील तरतूद आहे. यामध्ये उपचार वेळेत मिळावा, हाच उद्देश आहे. अश्याप्रकारे ५० टक्के लोकांचा जीव वाचू शकतो, असा विश्वासही गडकरी यांनी व्यक्त केला. ड्रायव्हिंग इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून लाखो तरुणांचा रोजगाराचा प्रश्न सुटू शकतो, असेही ते म्हणाले.

## ....अखेर शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत भुरे यांच्या सतत पाठपुराव्याला यश

### कोरोना काळात कर्तव्य बजावत असताना मृत्यू पावलेल्या अरोली पोलीस पाटील मदनकर यांना ५० लाख रुपये मंजूर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते आज दिले मंजुरीचे पत्र



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

अरोली येथील पोलीस पाटील स्वर्ग. गजानन मदनकर यांना कोरोना काळात कर्तव्य बजावत असतानाच आपले प्राण गमवावे लागले, अशा कर्तव्यावर असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाने ५० लाखांचे सानुग्रह अनुदान देण्याच्या निर्णय घेतला होता. राज्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी अनेक प्रयत्न करून त्यांना ही ५० लक्ष रुपयाची राशी मंजूर करून दिली. याबाबत शिवसेना मौदा तालुकाप्रमुख प्रशांत भुरे यांनीही राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता, हे विशेष!.

अखेर भुरे यांच्या सतत पाठपुराव्याला यश येऊन ५० लाख सानुग्रह अनुदानाचे पत्र आज शनिवार (ता. १ ऑगस्ट) ला मदनकर यांच्या पत्नी वनमाला गजानन मदनकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते त्यांच्या रामटेक येथील कार्यालयात देण्यात आले. याप्रसंगी मंत्री जयस्वाल, तालुकाप्रमुख भुरे, अरोली सरपंच रोशनी प्रशांत भुरे, वनमाला मदनकर, सदाराम मदनकर, सामाजिक कार्यकर्ते गणेश बावनकुळे उपस्थित होते.

ही माहिती आज भुरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध ग्रुप वर शेअर केले असता, राज्यमंत्री आशिष जयस्वाल व शिवसेना मौदा तालुकाप्रमुख प्रशांत भुरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला तर मदनकर यांच्या परिवाराने मंत्री जयस्वाल व तालुकाप्रमुख भुरे यांचे खूप खूप आभार मानले आहेत.

## स्मशानभूमीही बनली जुगाराचा अड्डा!

### भिवापूर पोलिसांची धाड, सहा जुगाऱ्यांना बेड्या, २.९८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शहरातील स्मशानभूमीसारख्या पवित्र आणि शांततेच्या ठिकाणालाही जुगारखोरांनी सोडले नसल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. मृतांच्या स्मृती जपल्या जाणाऱ्या परिसरातच ५२ पत्त्यांवर हार-जीतीचे डाव रंगविणाऱ्या सहा जुगाऱ्यांवर भिवापूर पोलिसांनी धाड टाकत कारवाई केली. या कारवाईत तब्बल २ लाख ९८ हजार ५४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, जुगारखोरांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. शनिवारी (१ ऑगस्ट) स्मशानभूमी परिसरात अवैध जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली. त्यानुसार ठाणेदार रवींद्र मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचून घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच जुगारखोरांची एकच धांदल उडाली; मात्र पोलिसांनी सहाही जणांना रंगेहात ताब्यात घेतले.

या कारवाईत खुशाल कवडुजी जांभुळे (५१), किशोर प्रल्हाद पिंपळकर (३२), सचिन सुरेश दिघोरे (२९), अजय बिसन वाघमारे (३८), कलदार प्रल्हाद गाडगे (५०) आणि धनराज गोपाळराव नागपुर (५४, सर्व रा. भिवापूर परिसर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळावरून ५२ ताशपत्ते, ४ हजार ५४५ रुपये रोख, सुमारे ७९ हजार रुपयांचे सहा मोबाईल फोन आणि २ लाख १५ हजार रुपयांच्या चार दुचाकी असा एकूण २ लाख ९८ हजार ५४५ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. स्मशानभूमीसारख्या ठिकाणीही बिनधास्तपणे जुगाराचे फड रंगत असल्याने कायद्याचा धाक कमी झाला आहे का, असा प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित होत आहे. भिवापूर पोलिसांनी मात्र वेळेत धाड टाकून जुगारखोरांचे मनसुबे उधळून लावले असून, पुढील तपास सुरू आहे.

## बी वॉर्डच्या शासकीय अधिकाऱ्यांची अक्षम्य चूक!

### लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी पण नाही दिवा नाही पणती



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

भारतीय स्वातंत्र्याचे जनक सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कायार्चे प्रेरणास्थान लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त आभिवादन करण्यासाठी कुलाबा विधानसभा प्रमुख विकास मा. मयेकर, उपविभाग प्रमुख बाजीराव मालुसरे आणि उपशाखा प्रमुख रंजिश जाधव गेले आसता दुर्दैवाची बाब म्हणजे बी वॉर्डच्या महापालिका अधिकाऱ्यांना पुण्यतिथीचा केवळ विसरच पडला नाही तर पुण्यतिथीदिनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. शिवसेनेच्या या पदाधिकाऱ्यांनी घटनेचा निषेध केला.

जगन्मान्य लोकनेत्याचं स्मारक उभारलं कि आपली जबाबदारी संपली अशी मुंबई महानगरपालिकेची धारणा आहे असे वाटावे असा प्रकार आज घडला. जे जे उड्डाण पुलाखाली लोकमान्य टिळकांचे शिल्प उभारले आहे, परंतु ते कायमच धुळीने माखलेले व त्याच्या खाली गर्दूल्यांचा वावर असलेले आढळते. लोकमान्यांच्या जयंती दिनी तरी त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून वा आदरापोटी तरी कमीत कमी आज तरी महापालिकेच्या वतीने हार फुले अर्पण करणे जाऊद्या किमान स्वछता तरी अपेक्षित आहे.

महापुरुषांच्या स्मृती जतन करणे जमले नाही तरी निदान त्यांची अवहेलना होणार नाही याची काळजी महापालिकेनी घ्यायला हवी. शिल्प बांधिस्त असल्यामूळे टिळकप्रेमी लोखंडी जाळीला पुष्प माळा परिधान करून आभिवादन करून गेले.

## सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त बामणीत भव्य रक्तदान शिबिर, ६४ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राज्याचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या ६४ व्या वाढदिवसानिमित्त बामणी येथे गुरुवारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधत तब्बल ६४ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली.

रक्तदान हेच श्रेष्ठ दान या संदेशाला प्रतिसाद देत युवकांसह विविध वयोगटातील नागरिकांनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शिबिर यशस्वी ठरले. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत देऊळकर, उपाध्यक्ष देबाशिश सिंग, तालुका महामंत्री रूमदेव देरकर, प्रकाश मुडपल्लीवार, अंकित ढवस, ओम कामडे, महेश तुराणकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत समाजहितासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व रक्तदाते, आयोजक, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांमधून गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास हातभार लागतो, त्यामुळे प्रत्येकाने नियमित रक्तदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला बामणी परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## पत्रकार भवनात टिळक पुण्यतिथी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या टिळक पत्रकार भवनात आज लोकमान्यांच्या अर्धपुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे सरचिटणीस अनुपम सोनी, टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रभाकर दुपारे, व्यवस्थापक विनोद देशमुख यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

## लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे (तुकाराम भाऊराव साठे) यांची जयंती आज पारशिवनी शहरात मातंग समाजातील अनुयायांनी



मोठ्या उत्साहात साजरी केली. यह आजादी झूठी है, मेरे देश की जनता भूखी है, विचारातून अण्णा भाऊ साठे यांनी स्वातंत्र्याचा खरा अर्थ सामाजिक आणि आर्थिक समानता असल्याचे अधोरेखित केले. दिन, दलित, दुबळ्या अशिक्षित समाजाला दिशा देणारे महामानव लोकशाहीर अण्णाभाऊ साठे त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या लहानशा गावात एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला.

कोणत्याही औपचारिक शिक्षणाचा अभाव असतानाही त्यांनी आपल्या अथांग प्रतिभा आणि संघर्षाच्या जोरावर मराठी साहित्यात व लोककलेत क्रांतिकारक योगदान दिले. त्यांनी रचलेल्या लावण्या, पोवाडे, कथा आणि कादंबऱ्यांमधून समाजातील शोषित, वंचित, कष्टकरी व कामगार वर्गाच्या व्यथा आणि संघषार्ला वाचा फोडली. फकीरा ही त्यांची कादंबरी मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानली जाते. तसेच, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांच्या शाहिरीने आणि कवनांनी जनतेला जागृत करण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिवस हा त्यांच्या विचारांचे स्मरण करण्याचा आणि समाजपरिवर्तनाची प्रेरणा घेण्याचा दिवस म्हणून मोठ्या उत्साहात समाजबांधवांनी साजरा केला .

## समतेचा दीप तेवत ठेवण्याचा संकल्प, वाडी नगर परिषदेत अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

"ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कष्टकरी कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे," असा समतेचा, श्रमप्रतिष्ठेचा आणि मानवतेचा विचार समाजाला देणारे लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वाडी नगर परिषद कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विनोद जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष नरेश चरडे, बांधकाम सभापती दिनेश कोचे तसेच नगरसेविका संगीता बावणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कायार्ला विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक कैलास मंथापुरवार, कमल कनोजे, नगरसेविका लीला रहांगडाले, कर विभाग प्रमुख दिनेश बुधे, प्रशासकीय अधिकारी अमेय मेटांगळे, प्रणय गायधने, लेखापरीक्षक अतुल सरदार, लेखापाल अमोल सोनसरे, दर्शन बिराजदार, पाणीपुरवठा अभियंता सुषमा भालेकर, सामाजिक कार्यकर्ते गुरुदास बावणे, गोविंद रोडे, दिवानजी रहांगडाले, विशाल लांजेवार तसेच नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पुष्पार्पण करून अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कायार्तून कष्टकरी, शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाला दिलेला स्वाभिमानाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. समता, सामाजिक न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांचे जतन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते. उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांच्या कायार्ला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

## प्रा . गिरीश देशमुख यांना मातृशोक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय जनता पक्षाचे नागपूरचे जेष्ठ नेते प्रा. गिरीश देशमुख यांच्या



मातोश्री विनया चंद्रकांत देशमुख (भारतीय जनता पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्या ) यांचे काल दि १ ऑगस्ट २६ रोजी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती चंद्रकांत(बाळासाहेब) देशमुख, गजानन व गिरीश हे दोन पुत्र व मुली माधुरी माधव गोडसे व मेघा शंतनू पांडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. आज रविवारी सकाळी १०.३० वाजता एफ-८, तात्या टोपे नगर (त्यांच्या राहते घरून) अंत्ययात्रा निघेल. तसेच सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

# १.४३ कोटींची इमारत; पण सुविधा शून्य

### जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्राची डॉ. अमोल देशमुख यांच्याकडून झाडाझडती, अधिकाऱ्यांना धारेवर धरले, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी थेट दूरध्वनीवर चर्चा, दर्जेदार चौकशीसह दोषींवर कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज २५० हून अधिक रुग्ण उपचारासाठी येत असले, तरी रुग्णांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याचे वास्तव शुक्रवारी (३१ जुलै) डॉ. अमोल रणजीत देशमुख यांच्या आकस्मिक पाहणीत उघड झाले. तब्बल १ कोटी ४३ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या नव्या इमारतीतही रुग्णाभिमुख सुविधा नसल्याने आरोग्य व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



पाहणीदरम्यान रुग्णांसाठी स्वतंत्र प्रतीक्षागृह नसणे, शवविच्छेदन गृहाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसणे, आपत्कालीन सेवांमध्ये अपुऱ्या सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव, मनुष्यबळाची कमतरता आणि व्यवस्थापनातील अनेक त्रुटी निदर्शनास आल्या. पावसाळ्यात चिखलातून मृतदेह नेण्याची वेळ नातेवाईकांवर येत असल्याने गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

यावेळी उपस्थित नागरिकांनी शवविच्छेदनासाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्यामुळे मृतांच्या नातेवाईकांकडून दोन ते तीन हजार रुपये उकळले जात असल्याचा गंभीर आरोप केला. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. देशमुख यांनी जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून केली. पाहणीवेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद मंदारी अनुपस्थित असल्याने डॉ. देशमुख यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ. जयंत कोहाड यांच्याकडून माहिती घेतली. त्यानंतर डॉ. मंदारी यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून अनुपस्थितीबाबत जाब विचारत आरोग्य सेवेतील त्रुटींवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावेळी डॉ. देशमुख यांनी आयपीएचएस-२०२२ निकषांनुसार इमारत उभारण्यात आली आहे का, मंजूर आराखडा, डीपीआर, बीओक्यू, गुणवत्ता अहवाल, पूर्णत्व प्रमाणपत्र व इतर अभिलेख सार्वजनिक करून स्वतंत्र तांत्रिक व कार्यात्मक लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी केली. अपघातप्रवण महामार्गालगत हे आरोग्य केंद्र असल्याने येथे तज्ज्ञ डॉक्टर, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, पुरेसे मनुष्यबळ आणि २४ तास आपत्कालीन सेवा तातडीने सुरू करण्याचीही मागणी त्यांनी केली. यावेळी डॉ. झीशान शेख, अबुतला खान, साजिद पठाण, गोलू चौरे, प्रशांत देशमुख, मनोज कळंबे, पप्पू महंत, नितीन रॉय, ललित रेंगे, प्रवीण राजपुरोहित, सागर सावरकर, कुणाल काटोलकर यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

**गावकऱ्यांचे वैद्यकीय अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप**

पाहणीदरम्यान ग्रामस्थांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद मंदारी यांच्याविरोधात गंभीर आरोप केले. रुग्णांना वारंवार त्रास देणे, भेटवस्तूंची मागणी करणे, दुकानदारांची देणी थकविणे, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या अर्जांवर स्वाक्षरी करण्यासाठी लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी करणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात अनुचित प्रकार घडत असल्याचे आरोप ग्रामस्थांनी मांडले.

या सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी डॉ. अमोल देशमुख यांनी केली. सदर आरोप ग्रामस्थांनी केले असून त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

> **"आरोग्य सुविधा उद्घाटनापुरत्या नसतात"**
> "सार्वजनिक निधीतून उभारलेली आरोग्य सुविधा ही केवळ उद्घाटनासाठी नसते. ती सुरक्षित, रुग्णाभिमुख, कार्यक्षम आणि मानकांनुसार असली पाहिजे. आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून त्यात कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही."
> **- डॉ. अमोल रणजीत देशमुख**

## आमगावात वाघ शिरल्याने नागरीकात भिंतीचे वातावरण

### वनविभागाच्या अथक प्रयत्नानंतर वाघाला पळवण्यात वन विभागाच्या अधिकाऱ्यांना यश



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

ग्रामीण भागात शेतीचे कामे केली जात असताना अचानक शनिवारी दुपारी शेतशिवारात वाघाने डरकाळी फोडीत हजेरी लावत शेतकऱ्यांना पळो की सळो करुन सोडल्याची घटना घडली. शनिवार दि.१ ऑगस्ट ला पारशिवनी तालुक्यातील आमगाव येथील शेतशिवारात घडली. शेतकरयांना वाघ दिसुन येताच शेतातील कामे सोडुन जिव मुठीत घेत भयभित होत शेतकरी पळु लागले होते.

वाघ दिसुन आल्याची वार्ता परिसरात पसरताच घटना स्थळावर मोठ्या संख्येने बघ्याची गर्दी एकत्रीत झाली होती. लागलीच या घटनेची माहिती पारशिवनी पोलीस व वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली असता तात्काळ वन विभागाचे कर्मचारी, अधिकारी, पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. वाघ झाडाझुडुपांमध्ये लपुन बसल्याने त्याला पळविण्यासाठी फटाके फोडण्यात आले मात्र वाघ पळुत जात नसल्याने घटना स्थळी जेसीपी मशिनच्या साह्याने या भागात पाहणी केली असता वाघ झाडाझुडपात दिसुन येताच फटाके फोडुन, आरडाओरडा करताच वाघ जंगलाच्या दिशेने पळुन गेल्याने गावकर यांनी आनंद व्यक्त केला. वन विभागाच्या प्रयत्नांना वाघ पळवणयात यश आल्याने कुठलीच अप्रिय घटना घडली नसल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

> जंगला शेजारील शेतकऱ्यांनी शेतीची कामे करताना सतर्क,सावघ राहुन काळजी घेणे गरजेचे आहे. वाघ दिसुन आल्याने वन विभागाचे कर्मचारी अधिकारी,अधिक सक्रिय असुन वाघ गावाशेजारील येणार नाही या करीता कार्यरत आहे.
> **- उपवन क्षेत्र अधिकारी जे.पी.मेंढे**
> **वन विभाग पारशिवनी**

## आमदार समीर मेघे यांच्या स्थानिक विकास निधीतून रोड खडीकरण रस्त्याचे उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी - मिलिंद गाडेकर**

स्थानिक विकास निधी २०२५/२६अंतर्गत श्रीराम नखाते ते मेजर तागडे यांच्याघरापर्यंत १५०मीटर खडीकरण रोडचे भूमिपूजन आमदार समीर मेघे यानी आज सायंकाळी ६.३०ला केले यावेळी या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित सरपंच राहुल सोनारे, उपसरपंच ओमप्रकाश भांगे हे होते. प्रमुख उपस्थिती गुणवंत घोरमाडे, प्रमोद गमे, प्रफुल ढोले, भूषण बोरकुटे, शशिकांत खोंडे, मनोज उचके, प्रमोद राऊत निलेश डहाके याशिवाय चक्कीखापा उपसरपंच ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार समीरमेघे यांनी त्यांच्या इलेक्शन पूर्ण काळातच शब्द दिलेला होता की, लेआऊट मध्दे पावसाळ्यात सर्वत्र पूर परिस्थिती तयार होते, नागरिकांना पुराच्या पाण्यातून मुला बाळांना शाळेत सोडावे लागते याबाबत मला स्थानिक भाजपा कार्यकर्ते यांच्या मार्फत निवेदन प्राप्त होते. त्या अनुषंगाने आज या श्रीराम नखाते ते श्री मेजर तागडे मेन रोडचे खडीकरण होत आहे त्यामुळे येथील नागरिकांना दळणवळण करने सोयीचे होणार आहे.

यापुढेही आपण लेआऊटच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले कार्यक्रमाला ठेकेदार खेमका, सचिव सुरेंद्र निघोट, हरलेजी रत्नाकर फाये, ध्यानेश्वर हिरणखेडे, गोपाल उमाठे नामदेव राऊत, उपसरपंच ओमप्रकाश भांगे, सुधाकर भांगे, भागवत सनोदिया, सुशील तिवारी, पुरुषोत्तम चिंचमलकर, दिनेश कोहळे, बिसेन जी, शत्रू सावरकर, महेश चौकसे, हिरसिंग कन्हैया, पन्नालाल दमांहे, सनोदिया, नामदेव राऊत, कपिल शिवणकर, पत्रकार मिलिंद गाडेकर, राजेश ताटीपाऊलवार, विशाल उके, मैत्रेय मिलिंद गाडेकर,ग्रामपंचायत सदस्य अपर्णा गाडेकर, रागिणी गोंडाने, नामु साहू, बाल्या मडामे, चंद्रशेखर आरखेल, संजय बावनकर, जगन्नात पोपते, काणेकर, दिलीप वर्मा, विशाल इवनाथे, योगेश मेश्राम, गौतम शेलारे, लिलाधर गौतम, कुंभरे गुरुजी, शेखजी, नरेश कुहीते, जगन्नाथ पोपते, राजू उदापूरे, योगेश मेश्राम, पिंटू वडुळे, गोपाल उमाठे, दीपक बनोटे, लिलाधर गौतम, लक्ष्मण तुरकर, यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

## जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्लिश स्कूल, भोवरीमध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण, पूजा अर्चना करून त्यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला.



याप्रसंगी अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या संघर्षावर मुख्याध्यापिका पठाण यांनी सांगितले की, "साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरी, पोवाडे आणि लावणीच्या माध्यमातून शोषितांचा आवाज उठवला.संयुक्त महाराष्ट्र लढा आणि गोवा मुक्तिसंग्राम यात त्यांनी शाहिरीच्या माध्यमातून मोठी जनजागृती केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी उपेक्षित व शोषित घटकांच्या हक्कासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. गोर-गरीब शेतकरी, शेतमजूर, श्रमिक, दलित, दलितांचा व्यथा-वेदना कथा, कादंबऱ्यांमधून प्रकर्षाने उमटाव्यात त्यांची अशी धारणा होती."

याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश निरगुळकर, उपाध्यक्ष प्रल्हाद वैद्य, ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ गिर्हेपुंजे, माता पालक अश्विनी बावणे, निकिता वैद्य, ज्योती वैद्य, रोहिणी चोपकर, अंगणवाडी सेविका ज्योती वाडीभस्मे, मदतनीस सेजल बावणे, ग्रामस्थ श्याम वैद्य, अर्जुन न्यायखोर, संजय न्यायखोर उपस्थिती होते.

# पुरामुळे बल्लारपूर-राजुरा मार्ग बंद : तेलंगणाकडे जाणारी वाहतूक ठप्प, वाहनांच्या लांबच लांब रांगा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बल्लारपूर तालुक्यासह संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शुक्रवारी सकाळी ९ वाजल्यापासून बल्लारपूर-विसापूर मार्ग पुराच्या पाण्याखाली गेल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. त्यानंतर पावसाचा जोर कायम राहिल्याने बल्लारपूर-राजुरा मार्गही बंद करण्यात आला असून विसापूरझ्नांदगाव पोडे मार्गही पाण्याखाली गेला आहे.



पाण्याची पातळी कमी झाल्याने सास्ती मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. बल्लारपूर-राजुरा मार्ग बंद झाल्यामुळे तेलंगणाकडे जाणारी प्रमुख वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी बल्लारपूर शहरात मालवाहू ट्रक, बस आणि इतर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून वाहनचालकांना तासन तास प्रतीक्षा करावी लागत आहे. पर्यायी मार्गांवरही वाहतुकीचा मोठा ताण निर्माण झाला आहे.

वर्धा व इरई नद्यांनी धोकादायक पातळी गाठली असून अनेक लहान-मोठे नाले दुथडी भरून वाहत आहेत. नदीकाठच्या नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा देत सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन केले आहे. मुसळधार पावसामुळे तालुक्यातील शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली गेली असून उभ्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन पथकांना सतर्कतेच्या सूचना दिल्या असून सर्व संबंधित विभागांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. इरई धरणाच्या जलसाठ्यातही वेगाने वाढ होत असून प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

नागरिकांनी नदी-नाल्यांच्या परिसरात जाणे टाळावे, पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून प्रवास करू नये तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संपूर्ण जिल्ह्यात आपत्कालीन यंत्रणा सक्रिय करण्यात आली असून परिस्थितीवर चोवीस तास नजर ठेवली जात आहे.

थोडक्यात

## लटोरी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते दिलीप ढेकवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

### खासदार प्रफुलभाई पटेल व खासदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते पक्षाचा दुपट्टा घालून स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

गोंदिया जिल्ह्याचे विकास पुरुष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार प्रफुलभाई पटेल आणि खासदार राजेंद्रजी जैन यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत सालेकसा तालुक्यातील लटोरी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते श्री. दिलीप ढेकवार यांनी शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. हा पक्षप्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सालेकसा तालुकाध्यक्ष डॉ. अजयजी उमाटे व जिल्हा महासचिव डॉ. हिरालालजी साठवणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी खासदार प्रफुलभाई पटेल आणि खासदार राजेंद्रजी जैन यांनी दिलीप ढेकवार यांना पक्षाचा दुपट्टा परिधान करून पक्षात स्वागत केले व त्यांच्या पुढील सामाजिक आणि राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी युवकांनी पुढे येऊन समाजहिताचे कार्य करावे, तसेच पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, ऋषी तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या पक्षप्रवेशामुळे सालेकसा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद आणखी वाढण्यास मदत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' वितरण सोहळा ३ ऑगस्ट रोजी

### हरगोविंद वनवासी छात्रावास, धारणी या संस्थेला प्रदान करणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धरमपेठ शिक्षण संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त दरवर्षी 'सामाजिक जाणीव दिवस' साजरा केला जातो. त्या निमित्ताने सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. धरमपेठ शिक्षण संस्थेच्या प्राचार्य विनायकराव फाटक स्मृती सभागृह, धरमपेठ म. कृ. देव विज्ञान महाविद्यालय, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर येथे सायं.६ वाजता हा कार्यक्रम होईल. १९९०-९१ सालापासून मेळघाटातील दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील हरगोविंद वनवासी छात्रावास, धारणी यांना यावर्षीचा हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सेवाभारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री विजयराज पुराणिक हस्ते पुरस्कार प्रदान केला जाईल. या पुरस्कार वितरण सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर, सचिव सुरेश देव आणि पुरस्कार समिती सदस्य डॉ. कुमार मुकुंद शास्त्री यांनी केले आहे.

## अशफाक शेख यांनी वाहिली मो. रफी यांना ४६ गीतांची स्वरसुमनांजली



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रसिद्ध गायक स्व. मोहम्मद रफी यांना त्यांच्या ४६ व्या पुण्यतिथी निमित्त एहसास-ए-रफी भाग-३ या कार्यक्रमाद्वारे नागपूर शहरातील रफीचा आवाज म्हणून ओळखले जाणारे अशफाक शेख यांनी ४६ गीते सादर करून स्वरसुमनांजली वाहिली. हार्मोनी इव्हेंट्स स्टुडिओमध्ये त्यांनी लागोपाठ ४६ गाणी सादर करीत रफी साहेबांना श्रद्धासुमने समर्पित केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, सीमा फडणवीस, तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक अवसरे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक संभाजी भोसले तसेच अर्थशास्त्री डॉ. हसन हुद्दा यांच्या उपस्थित झाले. अशफाक शेख यांच्या साथीला डॉ. रजनी हुड्डा, मोहम्मद आझाद, राजेश काळे, प्रमोद क्षीरसागर, दिलीप बामनोटे,प्रशांत मरसकोल्हे व मीनल बाविस्कर हे गायक होते. एहसास-ए-रफी भाग-१ व भाग-२ मध्ये सहभागी झालेले गायक कलाकार संजय बोरकर, प्रिया गुप्ता, कल्पना गणवीर, रोशनी सावरकर, कृष्णकुमार बैस, चारुदत्त, तुषार सायरे यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संवादिनीवर राजेश समर्थ होते. चॅम्पियन्स कराटे अकॅडमी अँड फिटनेस झोनचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे निवेदन आरती दुबे व अनिता सुरकार यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

## आकाश पाळण्यात केस अडकून २६ वर्षीय विद्यार्थिनी गंभीर जखमी

**लातूर :** जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. देवणी तालुक्यातील जवळगा साकोळ येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त भरलेल्या यात्रेत एक भीषण अपघात घडला आहे. फिरत्या आकाशपाळण्यात बसलेल्या १५ वर्षीय विद्यार्थिनीचे केस पाळण्याच्या बेरिंगमध्ये अडकल्याने तिच्या डोक्याची कातडी आणि केस उपटले गेले. या अपघातात ती गंभीर जखमी झाली आहे.

# राज्यपाल व गडकरी यांच्या हस्ते 'मंथन ४ युवा'च्या पोस्टरचे अनावरण




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'मंथन ४ युवा' या विशेष अभियानाच्या पोस्टरचे अनावरण महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर, नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, आमदार मोहन मते, आमदार प्रवीण दटके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, प्र कुलगुरु डॉ. अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. विजय खंडाळ तसेच 'मंथन ४ युवा' अभियानाचे संयोजक विष्णु चांगदे व रितेश गावंडे उपस्थित होते.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित, तंत्रज्ञानाभिमुख आणि दूरदर्शी कायार्तून प्रेरणा घेऊन 'मंथन ४ युवा' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (अक), नवतंत्रज्ञान, स्टार्टअप संस्कृती, नवोपक्रम, कौशल्य विकास, डिजिटल सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून नव्या पिढीला सक्षम, जबाबदार आणि राष्ट्राभिमानी नागरिक म्हणून घडविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

अभियानांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच युवकांसाठी 'Know Your Icon' स्पर्धा, पेटेंट फेस्ट, विज्ञान प्रदर्शन, विकसित नागपूर हॅकाथॉन, स्टार्टअप फेस्ट, चित्रकला, नृत्य, गीतगायन, वक्तृत्व, काव्यवाचन तसेच ऑनलाइन फोटोग्राफी व रील स्पर्धा अशा विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधन वृत्ती, नवोपक्रम, उद्योजकता, सर्जनशीलता, नेतृत्वगुण, सांस्कृतिक अभिव्यक्ती, संविधानिक मूल्ये, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रहिताची भावना दृढ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या कार्यक्रमाला 'मंथन ४ युवा' अभियानाचे संचालन समिती चे डॉ. राजेश गादेवार, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ.अभय मुद्गल, केतन मोहितकर, डॉ.संजय ढोबळे, डॉ. सोमदत्त करंजीकर, विनय चावला, प्रकाश शुक्ला, निधी बावशे, डॉ. सचिन हजारे, डॉ. प्रदीप बिबटे, विनोद कडू, डॉ. राजेश ढोबळे, डॉ. विजय दातारकर, वैभव बावनकर, डॉ. सुमित सिंह, डॉ. राजेश देवकाते, डॉ. गजानन पोलनवार तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

### असे आहेत उपक्रम

१-२० ऑगस्ट - फोटोग्राफी व रील मेकिंग स्पर्धा
८ ऑगस्ट - पुस्तक प्रकाशन
८-१७ ऑगस्ट - चित्रकला स्पर्धा - प्राथमिक फेरी
१२-१७ ऑगस्ट - 'Know Your Icon' स्पर्धा
१४ ऑगस्ट - कवितावाचन स्पर्धा
१७ ऑगस्ट - कॉम्पिटेटीव्ह एक्झाम फेस्ट
१८ ऑगस्ट - पेटेंट गॅलरी, चित्रकला स्पर्धेची अंतिम फेरी
१८ ऑगस्ट - देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा व इलोक्युशन स्पर्धा
१७-१८ ऑगस्ट - विज्ञान प्रदर्शनी, स्टार्टअप फेस्ट व विकसीत नागपूर हॅकाथॉन
१९ ऑगस्ट - नृत्य स्पर्धा व आयडियाथॉनची अंतिम फेरी
२० ऑगस्ट - युथ समिट
२३ ऑगस्ट - समारोपीय सोहळा

**२३ ऑगस्टला भव्य समारोप**

'मंथन ४ युवा' अभियानाचा भव्य समारोप रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यात हजारो ढोल-ताशा वादकांचे महावादन हे प्रमुख आकर्षण राहणार असून भव्य चित्र प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे. विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके, तर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

नागपूरातील शाळा, महाविद्यालये आणि युवकांनी 'मंथन ४ युवा'च्या विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अभियानाचे संयोजक विष्णु चांगदे आणि रितेश गावंडे यांनी केले आहे.

## मनपातर्फे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना विनम्र अभिवादन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचे जयंती निमित्त दिक्षाभूमी चौक स्थित अण्णाभाऊ साठे यांचे अर्धकृती पुतळ्यास उपमहापौर लिला हाथीबेड यांनी माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पुण्यतिथी निमित्त शुक्रवारी तलाव स्थित लोकमान्य टिळक यांचे पुतळ्यास उपमहापौर लिला हाथीबेड यांनी माल्यार्पण करण्यात आले.



प्रसंगी माजी आमदार गिरीश व्यास, माजी महापौर दयाशंकर तिवारी तसेच मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते. मनपा सिव्हील कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे प्रतिमेला दुर्बल घटक समितीच्या सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले यांनी माल्यार्पण केले. प्रसंगी माजी नगरसेविका दुर्गा हत्तीठेले, विधी अधिकारी सुरज पारोचे, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, प्रमोद बारई, शैलैश जांभुळकर, अण्णाभाऊ साठे स्मारक समितीचे प्रकाश उकुंडे, सागर जाधव, महेंद्र पधान, बंटी इंगळे, सौ. कांचन राहुल बावणे, प्रविण डोंगरे, सोनु भोईमोर, सुनिल शिंदे व इतर समाज बांधव उपस्थिति होते.

# विलास गजघाटेसह चौघांवर गुन्हा दाखल

- भदंत सुरेई ससाई यांची बजाजनगर ठाण्यात तक्रार
- समिती कार्यालय, प्राचार्यांच्या खोलीचे तोडले कुलूप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे (दीक्षाभूमी) कार्यालय आणि महाविद्यालय प्राचार्यांच्या खोलीचे कुलूप तोडल्या प्रकरणी बजाजनगर पोलिसांनी समितीचे सदस्य विलास गजाघाटेसह चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक यांच्या तक्रारीची वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतनसिंग चव्हाण यांनी गंभीर दखल घेत विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. डॉ. प्रदीप आगलावे, शरद मेशाम आणि मिलिंद थुल अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

ससाई यांनी (एफआयआर नुसार) तक्रारीत म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे कामकाज चालविले जाते, अध्यक्षच कामकाज पाहतात. २४ जुलै रोजी समितीचे सदस्य विलास गजघाटे, डॉ. प्रदीप आगलावे, मिलिंद थुल आणि शरद मेशाम यांनी अनधिकृतपणे दीक्षाभूमी स्मारक समितीचे कार्यालयात मिटिंग घेतली.

यासंदर्भात भदंत सुरेई ससाई म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची (दीक्षाभूमी) बदनामी तसेच समितीविरूध्द कृत्य केल्या प्रकरणी समितीच्या संविधानानुसार कारवाई करीत विलास गजघाटे यांचे (५ जुलै २०२६) गव्हर्निंग बॉडीचे सदस्यत्व रद्द केले. त्यांना समितीच्या पदावरून कायमस्वरुपी काढण्यात आले. यानंतरही त्यांनी अनधिकृतपणे मिटिंग घेतली आणि कुलूप तोडले.

मिटिंगमध्ये समितीचे इतरही सदस्य होते. इतर सदस्य निघून गेल्यावर गजघाटेसह चौघांनी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास समिती कार्यालयाचे कुलूप तोडले आणि लगेचच स्वतजवळील दुसरे कुलूपही लावले. या प्रकारामुळे महाविद्यालयातील कामे थांबली. त्यानंतर महाविद्यालय प्राचार्यांच्या खोलीचे कुलूप तोडले आणि दुसरे कुलूप लावले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यांच्या तक्रारीची वपोनि चव्हाण यांनी गंभीर दखल घेत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. गजघाटेसह चौघांही विरूध्द बीएनएस प्रमाणे कलम ३३२ (सी), ३३४ (१), ३३४ (२), ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला.

## राज्यातील १०६ शाळांचे सुमारे १,५०० विद्यार्थी होणार सहभागी

### राज्यस्तरीय खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद, प्राथमिक फेरी ३, ४ व ५ ऑगस्ट रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व राष्ट्रीय महामार्ग मंत्री मा. नितीन गडकरी यांच्या प्रेरणेने यंदा प्रथमच राज्यस्तरीय खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून राज्यभरातून या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. स्पर्धेत एकूण १०६ शालेय चमूतील सुमारे १,५०० विद्यार्थी देशभक्तीच्या स्वरांनी वातावरण भारावून टाकणार आहेत. मागील चार वर्ष ही स्पर्धा नागपूर स्तरावर घेण्यात येत होती. यंदा प्रथमच स्पर्धेला राज्यस्तरीय रूप देण्यात आले आहे, हे विशेष.

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी, नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन सोमवार, ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे होत आहे. नागपूर शहर व जिल्ह्यासह मुंबई, पुणे, ठाणे, देवाची आळंदी, धामणगाव, अमरावती, वर्धा, वरूड, उमरेड, यवतमाळ, सावनेर, भिवापूर, चंद्रपूर, बुलढाणा आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

गट 'अ' - इयत्ता १ ते ५ साठी व गट 'ब' - इयत्ता ६ ते १० वी अशा दोन गटात होणाऱ्या स्पर्धेची प्राथमिक फेरी ३, ४ व ५ ऑगस्ट अशी तीन दिवस चालेल. या फेरीतून निवडलेल्या स्पर्धेकांची अंतिम फेरी १६ ऑगस्ट रोजी सुरेश भट सभागृहात होणार असून त्याच दिवशी सायं. ५.३० वाजता बक्षिस वितरण सोहळा होईल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे वितरीत केली जातील. स्पधेर्तील प्रत्येक सहभागी चमूला प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून अंतिम फेरीतील विजेत्या चमूतील प्रत्येक विद्यार्थ्याला रोख पारितोषिके तर विजेत्या संघाला प्रतिष्ठेचा "खासदार चषक" बहाल करण्यात येणार आहे.

# सालेकसा नगर पंचायत क्षेत्रातील प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांच्या मूलभूत सुविधांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**



सालेकसा नगर पंचायत क्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांना मूलभूत सुविधा, नवीन इमारती, दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर अत्यावश्यक विकासकामे तातडीने उपलब्ध करून देण्यात यावीत, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी लोकप्रतिनिधींना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी खासदार राजेंद्रजी जैन, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक तसेच जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष व आरोग्य-शिक्षण सभापती सुरेशजी हर्षे यांची भेट घेऊन सालेकसा नगर पंचायत क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्या त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सालेकसा नगर पंचायतची स्थापना सन २०१४ मध्ये झाली असून सन २०१८ मध्ये आमगाव खुर्द या मोठ्या ग्रामपंचायतीचाही नगर पंचायत क्षेत्रात समावेश करण्यात आला. या संपूर्ण क्षेत्रात सध्या ७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व १४ अंगणवाड्या कार्यरत आहेत. या संस्था जिल्हा परिषद प्रशासनाच्या अखत्यारित असल्या तरी त्यांची जागा नगर पंचायत हद्दीत येत असल्याने तांत्रिक व प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत.

या अडचणींमुळे शाळा व अंगणवाड्यांमध्ये नवीन इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती, रंगरंगोटी, आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच इतर विकासकामे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. परिणामी विद्यार्थ्यांना व लहान बालकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असून सालेकसा येथील ऐतिहासिक व गौरवशाली शैक्षणिक परंपरेलाही बाधा पोहोचत असल्याची खंत निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित विभागांमध्ये समन्वय साधत विकासकामांचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली.

निवेदन सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे, सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र बडोले तसेच ऋषी बैस उपस्थित होते.